## श्रीमती पुष्पाताई हिरे कला विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय मालेगाव कॅम्प नासिक
## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल
### सक्षम युवा समर्थ भारत दिनांक 18/12/2019 ते 24/12/ 2019

शैक्षणिक वर्ष 2019-2020 या वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे श्रमसंस्कार शिबिर मौजे टेहरे तालुका मालेगाव जिल्हा नाशिक या गावी घेण्यात आले. सदर टेहरे गाव 5479 लोकसंख्या असलेले तसेच 60 टक्के ओबीसी व 40 टक्के भटक्या जाती, अनुसूचित जाती या संवर्गातील समूहाने बनलेले आहे. शिबिराचे उद्दिष्टे सक्षम युवा समर्थ भारत या उपक्रमाने घेण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय व उद्दिष्ट प्रमाणे पुढील सात दिवसीय श्रम व ज्ञान संस्कार कार्यक्रम घेण्यात आले

1. दिनांक 18/12/2019 रोजी मौजे टेहरे येथील ग्रामपंचायत परिसरात शिबिराचे उद्घाटन माननीय श्रीमती वर्षा पाटील, पोलीस उपनिरीक्षक, दामिनी पथक मालेगाव यांच्या हस्ते करण्यात आले. मुलींनी शिक्षणाने परिपक्व बनले पाहिजे सामाजिक जागरूकता निर्माण करून समोरच्या व्यक्तीशी कसे वागावे याविषयी दक्ष असले पाहिजे मोबाईलच्या युगात एक छोटीशी चूक देखील स्त्रीचे संपूर्ण आयुष्य नष्ट करू शकते त्यामुळे सावधानता बाळगणे महत्वपूर्ण आहे असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले. टेहरे ग्रामपंचायत सरपंच चंदनाताई शरद शेवाळे यांनी आपल्या मनोगतातून शिकलेल्या मुलींनी खेड्या विषयी आपलेपणाची भावना बाळगणे आवश्यक असून यातूनच ग्राम विकास शक्य आहे असे मत मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. उज्वला एस देवरे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना शिस्त व संस्कारांचे महत्त्व शिबिराच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. आत्मविश्वास, धाडस व कार्य करण्याची ऊर्जा निर्माण होते, राष्ट्र भावना निर्माण होऊन आपलेपणाची भावना विकसित होते असे विचार याप्रसंगी मांडले. श्री बी एम पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विशद केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ. दीपांजली बोरसे यांनी प्रास्ताविकात हिवाळी शिबिराची रूपरेषा मांडली. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. डी ए पवार, प्रा डॉ. डी जी जाधव, मा. उपसरपंच दिनेश शेवाळे, ग्रामपंचायत सदस्य सौ स्मिता ह्यारीज, श्री संदीप शेवाळे, श्री श्रीकांत शेवाळे, ग्रामविकास अधिकारी श्री के एस जाधव, पोलीस पाटील श्री निलेश पाटील उपस्थित होते. दुपारच्या सत्रात दाभाडी येथील सामान्य रुग्णालयाचे कर्मचारी मंगला सूर्यवंशी व त्यांचे सहकारी यांनी एच आय वी एड्स बाबत मार्गदर्शन केले तसेच रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले जवळपास 94 स्वयंसेवकांनी याप्रसंगी रक्त तपासले व डॉक्टर श्रीमती मीना पाटील यांनी महिला सबलीकरण या विषयावर प्रबोधन केले.

2. दिनांक 19/12/2019 रोजी सकाळी ग्रामस्वच्छता फेरी काढण्यात आली व ग्रामपंचायत परिसर, जॉगिंग ट्रॅकचा परिसर स्वच्छ करण्यात आला. दुपारच्या सत्रात राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. डि के आहेर व विभागीय समन्वयक प्रा लोदी फातेमा यांनी शिबिरास सदिच्छा भेट दिली व भारत महासत्ता बनण्याचे स्वप्न साकार करायचे असेल तर ग्रामीण विकासाला कैंद्रबिंदू मानले पाहिजे व युवकांनी सक्षम होऊन विज्ञाननिष्ठ विचारांनी प्रेरित होऊन समाज सेवा व राष्ट्र सेवा करण्याची गरज असल्याचे डॉ. डि के आहेर यांनी सांगितले. दुपारच्या सत्रात प्रा विजय शेवाळे यांनी स्वयंरोजगार व तरुणाई व डॉ. बी एम सोनवणे यांनी पर्यावरण रक्षण या विषयावर प्रबोधन केले.

3. दिनांक 20/12/2019 रोजी संत गाडगे महाराज पुण्यतिथीचे औचित्य साधून गावातील झेड पी शाळा परिसर व चौकाचौकात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. दुपारच्या सत्रात ह-भ-प सदानंद शेवाळे यांनी सद्विचार व वर्तन या विषयावर व्याख्यान दिले तसेच उत्कर्ष अहिरे यांनी ग्रामीण विकास व भौगोलिक रचना या विषयावर मार्गदर्शन केले.

4. दिनांक 21/12/2019 रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची गावात व आदिवासी वस्तीत ग्रामस्वच्छता व फेरी काढण्यात आली. बेटी बचाव बेटी पढाव, जल है तो कल है, झाडे लावा झाडे जगवा, सक्षम युवा समर्थ भारत चे नारे दिले तसेच सर्वेक्षण व आधार कार्ड सर्वे आणि व्यसनमुक्ती, प्लास्टिक मुक्त अभियान, स्त्रियांवरील अत्याचार, स्वच्छता व सांडपाणी इत्यादी विषयांवर पथनाट्य सादर करून जनजागृती करण्यात आली. त्याचप्रमाणे जॉगिंग ट्रॅकच्या कडेला वृक्ष लागवडीसाठी 25 खड्डे करण्यात आले. दुपारच्या सत्रात महाराष्ट्र राज्य

उत्पादन शुल्क विभागाचे भरारी पथक उपाध्यक्ष मा दिगंबरराव शेवाळे यांनी स्पर्धा परीक्षा यावर मार्गदर्शन केले. मा श्रीमती अपेक्षा पगार समुपदेशक, महिला व बालकल्याण विभाग, मालेगाव यांनी महिला सक्षमीकरण व प्रा. नवनीता देसले यांनी माती व पाणी परीक्षण या विषयावर मार्गदर्शन केले.

5. दिनांक 22/12/2019 रोजी चेहरे येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर अपघात घडू नये म्हणून गाडींना रिफ्लेक्टर लावण्यात आले. रस्ता सुरक्षा यावर पथनाट्य सादर करून जनजागृती करण्यात आली व नवीन जॉगिंग ट्रॅक होत असलेल्या ठिकाणी मातीचा सपाटीकरण करून श्रमदान करण्यात आले. दुपारच्या सत्रात डॉ. कल्याण कोकणे यांनी व्यसनमुक्ती व व्यक्तिमत्त्वविकास आणि श्री दीपक गुप्ता यांनी शासकीय योजनांचे मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान दिले.

6. दिनांक 23/12/2019 रोजी जॉगिंग ट्रॅक येथील मातीचा सपाटीकरण व खड्डे करण्यात आले तसेच अवयव दान श्रेष्ठ दान जनजागृती रॅली व पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. दुपारच्या सत्रात प्रा सलीम पिंजारी यांनी स्थानिक इतिहास लेखन व प्रा जे.डी. पगार यांनी स्वामी विवेकानंद यांचे विचार यावर व्याख्यान दिले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी गावकऱ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले याप्रसंगी नृत्य, गाणी व फिशपोंड सादर करून मनोरंजन करण्यात आले.

7. दिनांक 24/12/2019 रोजी जॉगिंग ट्रॅकच्या कडेला वृक्षारोपण करण्यात आले. जवळपास पंचवीस वृक्षांची लागवड करण्यात आली. शिबिराच्या समारोप प्रसंगी ग्रामपंचायत सरपंच सौ चंदनाताई शरद शेवाळे, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी श्री जाधव, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ उज्वला देवरे, उपप्राचार्य प्रा. डी. ए. पवार, प्रा डॉ डी. जी. जाधव तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. या सात दिवसीय शिबिरात राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थिनी प्रतिनिधी व सर्व स्वयंसेवकांनी गावातील जनतेशी सुसंवाद साधला. राष्ट्रीय उभारणी व ग्रामस्वच्छता जन जागरणात मोलाचा हातभार लावला. प्राचार्य डॉ. उज्वला देवरे, उपप्राचार्य प्रा. डी. ए. पवार, प्रा डॉ डी. जी. जाधव तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपांजली बोरसे, डॉ. रमेश निकम, प्रा शितल साळुंखे तसेच श्री बी एम पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी मनोज देशमुख, प्रा शिंपी मॅडम यांनी शिबिर यशस्वी केले.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
श्रीमती पुष्पाताई हिरे महिला कॉलेज
मालेगाव कॅम्प (नाशिक)

PRINCIPAL
S.P.H. Mahila Mahavidyalaya
Malegaon Camp-423 105 (Nashik)